~//

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
निवडणुक विभाग
EMAIL ID :electionmbmc@gmail.com दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/नि.वि/ ९33 /२०२१-२२ दि.02 / 03 /२०२२

## "परिपत्रक"

मा. भारत निवडणुक आयोगाने दि. 25/01/2022 ते 15/03/2022 या कालावधीत "राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा" ONLINE आयोजित केली असुन स्पर्धे अंतर्गत अ) प्रश्न मंजुषा स्पर्धा, ब) व्हिडीयो तयार करण्याची स्पर्धा, क) पोस्टरची डिझाईन करण्याची स्पर्धा, ड) गाण्याची स्पर्धा, ई) घोषवाक्य (Slogan) या पाच स्पर्धेत स्पर्धकांना भाग घेता येईल. सदर स्पर्धा सर्वांसाठी खुली असुन सदर स्पर्धेतील अ) प्रश्न मंजूषा स्पर्धेत भाग घेणे अतिशय सोपे असुन या स्पर्धेत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व अधिकारी / कर्मचारी / शिक्षक / संगणक चालक / कंत्राटी कामगार व त्यांचे कुटुंबिय यांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावयाचा आहे. त्यामुळे राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धेचा जनजागृतीचा उद्देश सफल होणेस मदत होईल.

तरी सर्व प्रभाग अधिकारी / विभाग प्रमुख यांनी जातीने लक्ष घालुन त्यांच्या कडील अस्थायी संगणक चालकां मार्फत http://ecisveep.nic.in/contest या लिंकवर त्यांच्या अधिनस्त अधिकारी / कर्मचारी / शिक्षक / संगणक चालक / कंत्राटी कामगार यांचे नांव नोंदवुन स्पर्धेत भाग घेवुन ONLINE ई-प्रमाणपत्र प्राप्त करून घेवुन राष्ट्रीय कामास हातभार लावावा.

(मारूती गायकवाड)
उप-आयुक्त (मु.) व उप-निवडणुक अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## <u>भारत निवडणुक आयोग</u>

आयोजित

## <u>!! राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा !!</u>

भारताच्या पहिल्या मतदार जागृती स्पर्धेत आता सहभागी व्हा. भित्तिचित्र,गीत,व्हिडिओ,घोषवाक्य आणि प्रश्न मंजूषा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी <u>http://ecisveep.nic.in/contest/</u> वर लॉग इन करा. तुमच्या प्रवेशिका <u>Voter-contest@eci.gov.in</u> येथे 15 मार्च 2022 पूर्वी पाठवा.

**पहिल्या राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धेत सहभागी व्हा, आकर्षक रोख पारितोषिके मिळवा.**

सर्जनशील माध्यमातुन प्रत्येक मताचे महत्व पटवून देण्यासाठी, भारत निवडणुक आयोगाने 2022 च्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त "माझे मत माझे भविष्य-एका मताचे सामर्थ्य" ही राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा सुरु केली आहे. SVEEP (Systematic Voters Education and Electoral Participation) मतदारांचे पध्दशीर शिक्षण आणि निवडणुक सहभाग कार्यक्रमाअंतर्गत राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा आयोजित करून निवडणुक आयोग सामान्य लोकांच्या प्रतिभा आणि सर्जनशिलतेचा वापर करून त्यांच्या सक्रिय सहभागातुन लोकशाही बळकट करत आहे. यामध्ये सर्व वयोगटांना सहभागी होता येणार आहे. सामूहिक सहभागातून लोकशाहीतील प्रत्येक मताचे महत्व विशद करण्याच्या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित कल्पना व मजकूरांचा गौरव करणे, असा या मागील उद्देश आहे.

1) **मध्यवर्ती संकल्पना :- "माझे मत माझे भविष्य-एका मताचे सामर्थ्य"**

2) **राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत पाच प्रकारच्या स्पर्धा होत आहेत :-** प्रश्नमंजूषा स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, गीत स्पर्धा, व्हिडीओ मेकिंग स्पर्धा आणि भित्तिचित्र स्पर्धा.

क) **प्रश्नमंजूषा स्पर्धा :-** प्रश्नमंजूषा स्पर्धाही जिज्ञासू मनांना सहभागी करून त्यांची निवडणूकीबाबतची जागरुकता पातळी जाणून घेण्याचा प्रयतन आहे. या स्पर्धेमध्ये 3 स्तर असतील (सुलभ,मध्यम आणि अवघड). स्पर्धेच्या तीनही स्तरांची पूर्तता केल्यास सर्व सहभागींना ई-प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

ख) **घोषवाक्य स्पर्धा :-** या स्पर्धेत सहभागी व्हा आणि दिलेल्या मध्यवर्ती संकल्पनेवर तुमचे शब्द गुफून इतरांना प्रेरणा देण्यासाठी आकर्षक घोषवाक्य तयार करा.

ग) **गीत स्पर्धा :-** शास्त्रीय, समकालीन आणि रॅप इत्यादीसह कोणत्याही स्वरूपातील गीताच्या माध्यमातुन स्पर्धकाच्या सर्जनशील मनाची प्रतिभा आणि क्षमता जोखाणे हे या स्पर्धेचे अद्दिष्ट आहे. सहभागी स्पर्धक दिलेल्या मध्यवर्ती संकल्पनेवर मुळ गीतरचना तयार आणि शेअर करू शकतात. कलाकार आणि गायक त्यांच्या आवडीचे वाद्य वापरू शकतात. गाण्याचा कालावधी तीन मिनिटांपेक्षा जास्त नसावा.

घ) **व्हिडीओ मेकिंग स्पर्धा :-** व्हिडीओ मेकिंग स्पर्धेतुन कॅमेराप्रेमींना भारतीय निवडणुकांचा उत्सव आणि त्यातील विविधता साजरी करणारा व्हिडीओ (चित्रफित) तयार करण्याची संधी मिळते. स्पर्धेच्या मुख्य विषयांव्यतिरिक्त, खालील विषयांवर देखील सहभागी स्पर्धक व्हिडीओ बनवू शकतात. :- माहितीपूर्ण आणि नैतिक मतदानाचे महत्व (प्रलोभनमुक्त मतदान) : मतदानाची शक्ती :- महिला, दिव्यांग व्यक्ती, जेष्ठ नागरिक, तरूण आणि नवीन मतदारांसाठी महत्व प्रदर्शित करणे. सहभागी स्पर्धकांना वरलपैकी कोणत्याही एका विषयावर केवळ एक मिनिट कालावधीचा व्हिडीओ करायचा आहे.

<u>**व्हिडीओ गाणे आणि घोषवाक्य स्पर्धेसाठी प्रवेशिका भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीनुसार कोणत्याही अधिकृत भाषेत दिल्या जाऊ शकतात.**</u>

ङ) **भित्तिचित्र स्पर्धा :-** वरील मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित आणि विचारप्रवर्तक अशी भित्तिचित्रे तयार करू शकणाऱ्या चित्रकार आणि कलाप्रेमिंसाठी ही स्पर्धा आहे. सहभागी स्पर्धक डिजिटल भित्तिचित्र, आरेखन किंवा रंगवलेली भित्तिचित्रे पाठवू शकतात. भित्तिचित्रांचे रेझोल्यूशन (रंगकणांचे पृथक्करण) चांगले असले पाहिजे.

## पुरस्कार आणि सन्मान :-

क) <u>गीत स्पर्धा :-</u>

| श्रेणी | पहिले बक्षिस | दुसरे बक्षिस | तिसरे बक्षिस | विशेष उल्लेखनीय |
|---|---|---|---|---|
| संस्थात्मक | 1,00,000 | 50,000 | 30,000 | 15,000 |
| व्यावसायिक | 50,000 | 30,000 | 20,000 | 10,000 |
| हौशी | 20,000 | 10,000 | 7,500 | 3,000 |

ख) <u>व्हिडीओमेकिंग स्पर्धा :-</u>

| श्रेणी | पहिले बक्षिस | दुसरे बक्षिस | तिसरे बक्षिस | विशेष उल्लेखनीय |
|---|---|---|---|---|
| संस्थात्मक | 2,00,000 | 1,00,000 | 75,000 | 30,000 |
| व्यावसायिक | 50,000 | 30,000 | 20,000 | 10,000 |
| हौशी | 30,000 | 20,000 | 10,000 | 5,000 |

ग) <u>भित्तिचित्र स्पर्धा :-</u>

| श्रेणी | पहिले बक्षिस | दुसरे बक्षिस | तिसरे बक्षिस | विशेष उल्लेखनीय |
|---|---|---|---|---|
| संस्थात्मक | 50,000 | 30,000 | 20,000 | 10,000 |
| व्यावसायिक | 30,000 | 20,000 | 10,000 | 5,000 |
| हौशी | 20,000 | 10,000 | 7,500 | 3,000 |

घ) घोषवाक्य स्पर्धा :- प्रथम पारितोषिक-रू.20,000/-, द्वितीय पारितोषिक-रू.10,000/-, तृतीय पारितोषिक-रू.7,500/-, सहभागी होणाऱ्यांपैकी 50 स्पर्धकांना प्रत्येकी रू.2,000/- विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणुन देण्यात येतील.

ङ) प्रश्नमंजूषा स्पर्धा :- विजेत्यांना भारतीय निवडणूक आयोगाचे नाव असलेल्या आकर्षक वस्तू देण्यात येतील. तसेच तिसरी पातळी पूर्ण करणाऱ्या सर्व स्पर्धकांना इ-प्रमाणपत्रे देण्यात येतील.

## ❖ <u>कसे सहभागी व्हावे</u>

- स्पर्धकांनी तपशीलवार मार्गदर्शक तत्वे, नियम आणि अटी यांच्या माहितीसाठी स्पर्धेचे संकेतस्थळ <u>http://ecisveep.nic.in/contest/</u> येथे भेट द्यावी..
- स्पर्धकांनी त्यांच्या प्रवेशिका सर्व तपशिलांसह <u>Voter-Contest@eci.gov.in</u> इथे ईमेल कराव्यात. ईमेल करतांना स्पर्धेचे नाव <स्पर्धा> आणि <श्रेणी> याचा विषयात उललेख करावा.
- प्रश्नमंजूषा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, स्पर्धकांनी स्पर्धा संकेतस्थळावर नोंदणी करावी. सर्व प्रवेशिका 15 मार्च 2022 पर्यंत सहभागी स्पर्धकांच्या तपशीलांसह <u>Voter-Contest@eci.gov.in</u> या ईमेलवर पाठवण्यात याव्या.

**QR कोड**

**स्पर्धेच्या संकेतस्थळाला भेट देण्यासाठी स्कॅन करा.**

Scan to visit the

ecisveep.nic.in/contes